असा. क्र. ५२ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, ऑक्टोबर ३१, २००६/कार्तिक ९, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३.**—महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश .. .. .. .. | ३५५-३७१ |

**नियोजन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ ऑक्टोबर २००६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XIII OF 2006.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EMPLOYMENT GUARANTEE ACT, 1977.

**सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३.**

**महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

१९७८ चा महा. २०.



[किंमत : रुपये ९.००]

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) अध्यादेश, २००६ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये,— १९७८ चा महा. २०.

(क) खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (क-१) " केंद्रीय अधिनियम " याचा अर्थ, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५, असा आहे ; २००५ चा ४२.

(क-२) " केंद्रीय परिषद " याचा अर्थ, केंद्रीय अधिनियमाच्या कलम १० च्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेली, केंद्रीय रोजगार हमी परिषद, असा आहे ; ";

(ख) खंड (ङ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ङ १) " किमान वेतन " याचा अर्थ, किमान वेतन अधिनियम, १९४८ याच्या कलम ३ अन्वये, राज्य शासनाने संबंधित परिमंडलातील शेतमजुरांसाठी निश्चित केलेले किमान वेतन, असा आहे ;" ; १९४८ चा ११.

(ग) खंड (ट) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येतील :—

" (ठ) " राज्य परिषद " याचा अर्थ, कलम ४ अन्वये घटित केलेली, राज्य रोजगार हमी परिषद, असा आहे ;

(ड) " अंगमेहनतीचे अकुशल काम " याचा अर्थ, कोणतीही प्रौढ व्यक्ती कोणत्याही कौशल्याशिवाय किंवा विशेष प्रशिक्षणाशिवाय करण्यास सक्षम असेल असे कोणतेही अंगमेहनतीचे काम, असा आहे ;

(ढ) " वेतन दर " याचा अर्थ, कलम ७ मध्ये निर्दिष्ट केलेला वेतन दर, असा आहे.".

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मधील स्पष्टीकरण वगळण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० यामध्ये कलम ४ समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :---

राज्य रोजगार हमी परिषद.

" **४.** (१) या अधिनियमाच्या अंमलबजावणीचे नियमित संनियंत्रण व पुनरीक्षण करण्याच्या प्रयोजनांसाठी, राज्य शासन, " महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद " या नावाने ओळखली जाणारी एक राज्य परिषद घटित करील आणि या परिषदेचा एक अध्यक्ष असेल व राज्य शासन निश्चित करील इतके शासकीय सदस्य तसेच, पंचायत राज संस्था, कामगार संघटना व लाभवंचित गट यांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले पंधरापेक्षा जास्त नसतील इतके अशासकीय सदस्य असतील :

परंतु, या पोट-कलमान्वये नामनिर्देशित केलेल्या अशासकीय सदस्यांपैकी किमान एक तृतीयांश सदस्य महिला असतील :

परंतु आणखी असे की, या अशासकीय सदस्यांपैकी किमान एक-तृतीयांश सदस्य हे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि अल्पसंख्याक वर्ग यांतील असतील.

(२) ज्या अटी व शर्तीना अधीन राहून राज्य परिषदेच्या अध्यक्षाची व सदस्यांची नियुक्ती करता येईल अशा अटी व शर्ती, तसेच राज्य परिषदेच्या बैठकीची वेळ, ठिकाण व कार्यपद्धती या बाबी (तिच्या बैठकींसाठी आवश्यक असलेल्या गणपूर्तीसह) विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(३) राज्य परिषदेची कर्तव्ये व कार्ये यांमध्ये पुढील बाबी अंतर्भूत असतील,—

(एक) योजना व तिची अंमलबजावणी यासंबंधातील सर्व बाबींवर राज्य शासनास सल्ला देणे ; अग्रक्रमाने हाती घ्यावयाची कामे निश्चित करून त्यांची यादी तयार करणे ;

(दोन) हा अधिनियम व त्याखाली आखण्यात आलेल्या योजना यांचे संनियंत्रण आणि गाऱ्हाणी दूर करणारी यंत्रणा यांचा वेळोवेळी आढावा घेणे आणि त्यांत सुधारणा सुचविणे ; तसेच हा अधिनियम व त्याखालील योजना यांच्या विषयीच्या माहितीचा शक्य तितक्या व्यापक प्रमाणात प्रसार करणे ;

(तीन) या अधिनियमाच्या आणि योजनांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे ;

(चार) राज्य शासनामार्फत राज्य विधानमंडळापुढे ठेवावयाचा वार्षिक अहवाल तयार करणे ;

(पाच) राज्य शासन तिला नेमून देईल असे अन्य कोणतेही कर्तव्य वा कार्य पार पाडणे.

(४) राज्य परिषदेस, योजनांचे मूल्यमापन करण्याचा आणि या प्रयोजनाकरिता ग्रामीण अर्थव्यवस्थेशी आणि योजनांच्या अंमलबजावणीशी संबंधित आकडेवारी गोळा करण्याचा अथवा गोळा करण्याची व्यवस्था करण्याचा अधिकार असेल.".

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील, पोट-कलम (२) मध्ये,— सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ७ ची सुधारणा.

(क) खंड (सात) मधील, " राज्य शासन वेळोवेळी निश्चित करण्यात " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " अशा रीतीने दरांची अनुसूची निश्चित करील " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " केंद्रीय अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (२) अन्वये केंद्र सरकारने विनिर्दिष्ट केलेल्या वेतन दराइतके वेतन मिळेल आणि असा दर विनिर्दिष्ट करण्यात आला नसेल तर, राज्य शासनाने वेळोवेळी (संबंधित परिमंडलातील) शेतमजुरांसाठी निश्चित केलेल्या किमान वेतनाइतके एकूण वेतन मिळेल अशा रीतीने दरांची अनुसूची निश्चित करण्यात येईल " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (चौदा) मध्ये, " सानुग्रह प्रदान म्हणून राज्य शासन याबाबत काढलेल्या सर्व-साधारण आदेशाद्वारे वेळोवेळी निश्चित करील " या मजकुराऐवजी " सानुग्रह प्रदान म्हणून, राज्य शासन याबाबतीत काढलेल्या सर्वसाधारण आदेशाद्वारे निश्चित करील अशी, पन्नास हजार रुपये किंवा त्याहून अधिक " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १२ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १२ मध्ये, पोट-कलम (३) मधील, खंड (ख) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ख-१) केंद्रीय अधिनियमाच्या कलम २८ अन्वये केंद्र सरकारकडून मिळालेली कोणतीही रक्कम ; ".

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १३ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये, पोट-कलम (१) मधील, " अनुसूचीच्या " या मजकुराऐवजी " अनुसूची एकच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० यामध्ये कलम १४क समाविष्ट करणे.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

शास्ती.

" **१४क.** जो कोणी, कलम ९ वगळता या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करील, तो, दोष सिद्ध झाल्यानंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल . ".

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० यामध्ये कलमे १६क व १६ख समाविष्ट करणे.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील:--

अनुसूची दोन व तीन यामध्ये सुधारणा करण्याचा अधिकार.

" **१६क.** राज्य शासनास, वेळोवेळी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूची दोन किंवा अनुसूची तीन मध्ये कोणतीही नोंद जादा दाखल करून किंवा त्यांमधील कोणत्याही नोंदीमध्ये फेरबदल करून किंवा कोणतीही नोंद वगळून त्यांची सुधारणा करता येईल आणि त्यानंतर, उक्त अनुसूचीमध्ये त्यानुसार सुधारणा करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

अनुसूची दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांमध्ये अधिनियमाच्या तरतुदी फेरबदलांसह लागू असणे.

**१६ख.** या अधिनियमाच्या, कलम १ मध्ये किंवा इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या तरतुदी अनुसूची दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांना, महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) अध्यादेश, २००६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास व त्या दिनांकापासून पुढील फेरबदलांना अधीन राहून, लागू असतील :— २००६ चा महा. अध्या. १३.

**(एक)** कलम २ मध्ये,—

(क) खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :---

" (क-क१) " अर्जदार " याचा अर्थ, ज्याने योजनेखालील रोजगारासाठी अर्ज केलेला आहे असा कुटुंबप्रमुख किंवा त्या कुटुंबातील इतर कोणतीही प्रौढ व्यक्ती, असा आहे ;

(क-क२) " गट क्षेत्र " याचा अर्थ, ग्रामपंचायतींचा गट समाविष्ट असलेल्या एका जिल्ह्यातील सामूहिक विकास क्षेत्र, असा आहे ; " ;

(ख) खंड (क-२) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (क-३) " जिल्हा कार्यक्रम समन्वयक " याचा अर्थ, जिल्ह्यामध्ये योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी कलम ६-१क च्या पोट-कलम (१) अन्वये जिल्हा कार्यक्रम समन्वयक म्हणून पदनिर्देशित केलेला अधिकारी, असा आहे ; " ;

(ग) खंड (घ) मध्ये, " कोणतेही इतर स्थानिक प्राधिकरण " या मजकुराऐवजी " पंचायत समिती, ग्रामपंचायत किंवा कोणतेही इतर स्थानिक प्राधिकरण अथवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेली अशासकीय संघटना " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) खंड (ङ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ङ-१क) " कुटुंब " याचा अर्थ, एकमेकांशी रक्ताच्या नात्याने, विवाहाने किंवा दत्तकग्रहणाद्वारे संबंधित असणाऱ्या आणि सर्वसाधारणपणे एकत्र राहणाऱ्या व एकत्र जेवण घेणाऱ्या किंवा सामाईक शिधापत्रिका असणाऱ्या कुटुंबातील व्यक्ती, असा आहे ; " ;

(ङ) खंड (छ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (छ-१) " अग्रक्रमाने हाती घ्यावयाचे काम " याचा अर्थ, योजनेअन्वये प्राथम्यतत्त्वावर अंमलबजावणीसाठी हाती घेतलेले कोणतेही काम, असा आहे ; " ;

(च) खंड (झ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (झ-क) " कार्यक्रम अधिकारी " याचा अर्थ, योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी कलम १० अन्वये नियुक्त केलेला अधिकारी, असा आहे ;

(झ-ख) " प्रकल्प " याचा अर्थ, अर्जदारांना रोजगार पुरविण्याच्या प्रयोजनासाठी योजनेअन्वये हाती घेतलेले कोणतेही काम, असा आहे ; ".

**(दोन)** कलम ५ मध्ये, पोट-कलम (२) मधील, " समिती अधिकारी " या मजकुराऐवजी " कार्यक्रम अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**(तीन)** कलम ६ ऐवजी, पुढील कलमे दाखल करण्यात येतील :—

" **६.** (१) या अधिनियमान्वये आखलेल्या योजनांचे नियोजन व अंमलबजावणी यांसाठी जिल्हा पातळीवर जिल्हापरिषद, गटक्षेत्र पातळीवर पंचायत समिती व ग्राम पातळीवर ग्रामपंचायत ही प्रमुख प्राधिकरणे असतील. योजनांचे नियोजन व अंमलबजावणी यांसाठी प्रमुख प्राधिकरणे.

(२) जिल्हा परिषदेची कार्ये पुढीलप्रमाणे असतील,—

(क) योजनेखालील कार्यक्रमांतर्गत गटक्षेत्रवार हाती घ्यावयाच्या अनेकविध प्रकल्पांना अंतिम रूप देणे आणि ती मान्य करणे ;

(ख) गटक्षेत्र स्तरावर व जिल्हा स्तरावर हाती घेतलेल्या प्रकल्पांचे पर्यवेक्षण करणे व संनियंत्रण करणे ; आणि

(ग) राज्य परिषदेकडून, तिला वेळोवेळी नेमून देण्यात येतील अशी इतर कार्ये पार पाडणे.

(३) पंचायत समितीची कार्ये पुढीलप्रमाणे असतील,—

(क) अंतिम मान्यतेसाठी जिल्हा परिषदेकडे पाठविण्यासाठी गटक्षेत्रस्तरीय योजनेला मान्यता देणे ;

(ख) ग्रामपंचायत व गटक्षेत्र स्तरावर हाती घेतलेल्या प्रकल्पांचे पर्यवेक्षण करणे व संनियंत्रण करणे ; आणि

(ग) राज्य परिषदेकडून, तिला वेळोवेळी नेमून देण्यात येतील अशी इतर कार्ये पार पाडणे.

(४) जिल्हा कार्यक्रम समन्वयक, जिल्हा परिषदेला, या अधिनियमाखालील तिची कार्ये आणि अधिनियमाखालील कोणतीही योजना पार पाडण्यास सहाय्य करील.

जिल्हा कार्यक्रम समन्वयक.

**६-१क.** (१) जिल्ह्यातील योजनेच्या अंमलबजावणीसाठी, जिल्ह्याचा जिल्हाधिकारी किंवा राज्य शासन ठरवील त्याप्रमाणे उचित दर्जाचा इतर कोणताही जिल्हास्तरीय अधिकारी यास जिल्हा कार्यक्रम समन्वयक म्हणून पदनिर्देशित करण्यात येईल.

(२) जिल्हा कार्यक्रम समन्वयक, या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्याखाली केलेले नियम यांनुसार जिल्ह्यात योजनेची अंमलबजावणी करण्यास जबाबदार असेल.

(३) जिल्हा कार्यक्रम समन्वयकाची कार्ये पुढीलप्रमाणे असतील,—

(क) जिल्हा परिषदेला, या अधिनियमाखालील तिची कार्ये आणि त्याखाली केलेली कोणतीही योजना पार पाडण्यास सहाय्य करणे ;

(ख) जिल्हा परिषदेकडून मान्य करून घ्यावयाच्या अनेकविध प्रकल्पांमध्ये अंतर्भाव करण्यासाठी गटक्षेत्रांनी तयार केलेल्या योजना आणि इतर अंमलबजावणी अभिकरणांकडून प्राप्त झालेले प्रकल्प प्रस्ताव एकत्रित करणे ;

(ग) जेथे जेथे आवश्यक असेल तेथे तेथे आवश्यक ती मंजुरी देणे आणि प्रशासकीय ना हरकत प्रमाणपत्र देणे ;

(घ) या अधिनियमान्वये अर्जदार ज्या रोजगारासाठी हक्कदार आहेत त्यांना तसा रोजगार पुरविलेला आहे याची खात्री करण्यासाठी त्याच्या अधिकारितेत कार्य करणाऱ्या कार्यक्रम अधिकाऱ्यांशी आणि अंमलबजावणी करणाऱ्या अभिकरणांशी समन्वय साधणे ;

(ङ) कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या कामगिरीचा आढावा घेणे, तिचे संनियंत्रण करणे व पर्यवेक्षण करणे ;

(च) चालू कामांचे नियतकालिक निरीक्षण करणे ; आणि

(छ) अर्जदारांची गाऱ्हाणी दूर करणे.

(४) राज्य शासन, जिल्हा कार्यक्रम समन्वयकाला त्याची या अधिनियमाखालील कार्ये पार पाडणे शक्य व्हावे म्हणून आवश्यक असतील असे प्रशासकीय व वित्तीय अधिकार त्याच्याकडे सोपवील.

(५) जिल्ह्याहून मोठ्या नसणाऱ्या क्षेत्रात अधिकारिता असणारा राज्य शासनाचा कार्यक्रम अधिकारी व इतर सर्व अधिकारी आणि जिल्ह्यात कार्यरत असणारी स्थानिक प्राधिकरणे व संस्था, जिल्हा कार्यक्रम समन्वयकाची या अधिनियमाखालील कार्ये आणि या अधिनियमाखाली तयार केलेल्या योजना पार पाडण्यासाठी त्यास सहाय्य करण्यास जबाबदार असतील.

(६) जिल्हा कार्यक्रम समन्वयक, जिल्ह्यातील अंगमेहनतीच्या अकुशल कामांच्या अंदाजित मागणीचा तपशील आणि या योजनेमध्ये समाविष्ट केलेल्या कामांवर मजूर लावण्याबाबतची तपशीलवार योजना अंतर्भूत असणारे पुढील वित्तीय वर्षासाठीचे मनुष्यबळ अंदाजपत्रक प्रत्येक वर्षाच्या डिसेंबर महिन्यात तयार करील आणि ते जिल्हा परिषदेला सादर करील.

**६-१ख.** (१) ग्रामपंचायत, तिच्या क्षेत्रामध्ये, अशी कामे पार पाडण्यासाठी आणि त्यांचे पर्यवेक्षण करण्यासाठी ग्रामसभेने केलेल्या शिफारशींनुसार, या योजनेअन्वये हाती घ्यावयाचे प्रकल्प निश्चित करण्यासाठी जबाबदार असेल. ग्रामपंचायतीची जबाबदारी.

(२) ग्रामपंचायतीस, कार्यक्रम अधिकारी मंजूर करील त्याप्रमाणे ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये या योजनेअन्वये कोणताही प्रकल्प हाती घेता येईल.

(३) प्रत्येक ग्रामपंचायत, ग्रामसभेच्या शिफारशी विचारात घेतल्यानंतर, विकास योजना तयार करील आणि जसजशी व जेव्हा जेव्हा काम पुरवण्याची गरज निर्माण होईल त्या त्या वेळी या योजनेअन्वये हाती घेता येतील अशा अनेकविध संभाव्य कामांची सूची तयार ठेवील.

(४) ग्रामपंचायत, ज्या वर्षामध्ये विकास प्रकल्पाचे काम सुरू करण्याचे प्रस्तावित केले आहे त्या वर्षाच्या प्रारंभापूर्वी, आपले विकास प्रकल्पांचे प्रस्ताव आणि त्यातील निरनिराळ्या कामांमधील प्राथम्यक्रम छाननीसाठी आणि प्राथमिक मान्यतेसाठी कार्यक्रम अधिकाऱ्याकडे पाठवील.

(५) कार्यक्रम अधिकारी, कामांवरील खर्चानुसार, योजनेखालील किमान पन्नास टक्के इतकी कामे ग्रामपंचायतीमार्फत पार पाडण्यासाठी नेमून देईल.

(६) कार्यक्रम अधिकारी, प्रत्येक ग्रामपंचायतीला,—

(क) तिने पार पाडण्यासाठी मंजुरी दिलेल्या कामांसाठी हजेरीपट पुरवील ; आणि

(ख) ग्रामपंचायतीच्या रहिवाशांना इतरत्र उपलब्ध असणाऱ्या रोजगाराच्या संधींची सूची पुरवील.

(७) ग्रामपंचायत, रोजगाराच्या कामांचे (संधींचे) अर्जदारांमध्ये वाटप करील आणि त्यांना त्या कामावर हजर होण्यास सांगेल.

(८) ग्रामपंचायतीने योजनेअन्वये हाती घेतलेली कामे, आवश्यक ती तांत्रिक मानके व मोजमापे यांनुसार असतील.

ग्रामसभेकडून कामाचे सामाजिक-दृष्ट्या मूल्यमापन.

**६-१ग.** (१) ग्रामसभा ग्रामपंचायतीतील कामांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करील.

(२) ग्रामसभा ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये हाती घेतलेल्या योजनेखालील सर्व प्रकल्पांचे नियमितपणे सामाजिकदृष्ट्या मूल्यमापन करील.

(३) सामाजिकदृष्ट्या मूल्यमापन करण्याच्या प्रयोजनासाठी ग्रामपंचायत, ग्रामसभेला हजेरीपट, देयके, प्रमाणके, मोजणी पुस्तके, मंजुरी आदेशांच्या प्रती आणि इतर संबंधित लेखापुस्तके व कागदपत्रे यांसह सर्व संबंधित कागदपत्रे उपलब्ध करून देईल." .

**(चार)** कलम ७ मध्ये,—

(१) पोट-कलम (२) मध्ये,—

(क) खंड (एक) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (एक) पुढील कामांवर, त्यांच्या प्राथम्यक्रमानुसार योजनेचा भर असेल :—

(क) जलसंधारण व जलसंचय ;

(ख) अवर्षण रोधन (वनरोपण व झाडांची लागवड यांसह) ;

(ग) सूक्ष्म (Micro) व लहान पाटबंधाऱ्यांच्या कामांसह सिंचन कालवे ;

(घ) अनुसूचित जातीतील व अनुसूचित जमातीतील कुटुंबांच्या मालकीच्या जमिनीला किंवा जमीन सुधारणा लाभार्थींच्या जमिनीला किंवा भारत सरकारच्या इंदिरा आवास योजनेखालील लाभार्थींच्या जमिनीला सिंचन सुविधा उपलब्ध करून देणे ;

(ङ) पारंपरिक जलाशयांचे नवीकरण करणे तसेच टाक्यांतील गाळ काढणे ;

(च) जमीन विकास ;

(छ) पूरनियंत्रण व संरक्षणविषयक कामे तसेच पाणी तुंबणाऱ्या भागातील जलनिस्सारणाची कामे ;

(ज) बारमाही कायम संपर्कासाठी ग्रामीण भाग एकमेकांना जोडणे ; आणि

(झ) राज्य शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल असे इतर कोणतेही काम ;" ;

(ख) खंड (सात) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (सात-क) कोणत्याही परिस्थितीत, मजुरांना, वेतनदरापेक्षा कमी वेतन देण्यात येणार नाही . " ;

(ग) खंड (आठ) मध्ये, " समिती अधिकारी " या मजकुराऐवजी, " कार्यक्रम अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) खंड (आठ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (आठ-क) व्यवहार्य असेल तेथवर, योजनेअन्वये निधी दिलेले काम, यंत्राचा वापर न करता अंगमेहनतीचे काम करणाऱ्या मजुरांचा वापर करून पार पाडण्यात येईल . " ;

(ङ) खंड (दहा) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (दहा-क) योजना, राज्य शासनाने योजनेखाली निर्माण करण्यात आलेल्या सार्वजनिक मत्तांचे योग्य परिरक्षण करण्यासाठी केलेल्या नियमांन्वये त्याने निश्चित केलेल्या समुचित उपाययोजनांच्या अधीन असेल . " ;

(च) खंड (अकरा) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (अकरा-क) योजनेखाली हाती घेतलेल्या प्रकल्पांच्या महत्त्वाच्या घटकांवरील खर्च तसेच कुशल आणि अर्ध-कुशल मजुरांच्या वेतनावरील खर्च हा एकूण प्रकल्प खर्चाच्या चाळीस टक्क्यांहून अधिक असणार नाही." ;

(छ) खंड (तेरा) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (तेरा-क) प्रत्येक योजनेमध्ये, योजनेच्या अंमलबजावणीच्या सर्व स्तरांवर खात्रीपूर्वक पारदर्शकता राहावी व जबाबदारी निश्चित करता यावी यादृष्टीने पुरेशा तरतुदींचा समावेश असेल.

(तेरा-ख) योजनेची अंमलबजावणी करणारा जिल्हा कार्यक्रम समन्वयक, कार्यक्रम अधिकारी व ग्रामपंचायत, त्याच्या किंवा तिच्या अधिकारितेत येणाऱ्या योजनेच्या अंमलबजावणीच्या संबंधातील तथ्ये व आकडे आणि संपादित उद्दिष्टे यांचा अंतर्भाव असणारा एक वार्षिक अहवाल तयार करील अणि त्याची एक प्रत, लोकांच्या मागणीनुसार व योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेली फी भरल्यानंतर उपलब्ध करून देण्यात येईल.

(तेरा-ग) योजनेच्या संबंधातील सर्व लेखे व अभिलेख छाननीकरिता जनतेला उपलब्ध करून देण्यात येतील आणि त्यातील संबंधित उताऱ्यांची प्रत मिळण्यासाठी इच्छुक असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, मागणी केल्यावर आणि योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेली फी भरल्यानंतर अशा प्रती किंवा उतारे उपलब्ध करून देण्यात येतील.

(तेरा-घ) प्रत्येक योजनेचा किंवा योजनेखालील प्रत्येक प्रकल्पाचा हजेरीपट पाहण्याची इच्छा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेली फी भरल्यानंतर त्यांची एक प्रत, ग्रामपंचायतीच्या व कार्यक्रम अधिकाऱ्याच्या कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येईल.";

(२) पोट-कलम (३) मध्ये, " अशी नोंदणी " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " मुख्यालयामध्ये करील " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" अशी नोंदणी, ती व्यक्ती जेथे राहते ते गाव ज्याच्या अधिकारितेत येत असेल त्या ग्रामसेवकाच्या मुख्यालयामध्ये करण्यात येईल ".

**(पाच)** कलम ८ मध्ये,—

(१) पोट-कलमे (१), (२) आणि (३) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

" (१) (क) जे कुटुंब,—

(एक) कोणत्याही ग्रामीण भागात रहात असेल ; आणि

(दोन) अंगमेहनतीचे अकुशल काम करण्यास इच्छुक असेल,

अशा प्रत्येक कुटुंबातील प्रौढ व्यक्तींना, नोकरीचे कार्ड मिळविण्याकरिता त्यांच्या कुटुंबाची नोंदणी करण्यासाठी, ते ज्या गावात रहात असतील ते गाव ज्या ग्रामपंचायतीच्या अधिकारक्षेत्रात येत असेल त्या ग्रामपंचायतीकडे आपले नाव, वय व निवासाचा पत्ता याबाबतची माहिती सादर करता येईल.

(ख) ग्रामपंचायतीला, तिला आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यावर, अशा कुटुंबाची नोंदणी करणे आणि राज्य शासन या योजनेमध्ये विनिर्दिष्ट करील असे, कुटुंबातील प्रौढ व्यक्तींचा तपशील अंतर्भूत असलेले व त्यांचे फोटो लावलेले नोकरीचे कार्ड देणे हे ग्रामपंचायतीचे कर्तव्य असेल.

(ग) या पोट-कलमान्वये करण्यात आलेली नोंदणी, योजनेमध्ये निर्धारित केलेल्या कालावधीसाठी असेल, परंतु कोणत्याही परिस्थितीत ती पाच वर्षांपेक्षा कमी कालावधीसाठी असणार नाही आणि तिचे वेळोवेळी नवीकरण करता येईल.

(घ) जर ग्रामपंचायतीची केव्हाही अशी खात्री पटली की एखाद्या व्यक्तीने चुकीची माहिती देऊन तिच्याकडे नोंदणी केली आहे तर तिला त्या व्यक्तीचे नाव नोंदवहीतून काढून टाकण्याचे निदेश देण्याबाबत कार्यक्रम अधिकाऱ्याला निदेश देता येतील आणि अर्जदाराला नोकरीचे कार्ड परत करण्याचे निदेश देता येतील :

परंतु, अर्जदारास, दोन स्वतंत्र व्यक्तींच्या उपस्थितीत त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज या परिच्छेदान्वये कोणतीही अशी कार्यवाही करण्याबाबत निदेश देता येणार नाही.

(२) (क) नोंदणीकृत कुटुंबातील ज्या प्रौढ व्यक्तीचे नाव नोकरीच्या कार्डावर असेल, ती प्रत्येक प्रौढ व्यक्ती, योजनेअंतर्गत असणारे अंगमेहनतीचे अकुशल काम करण्यासाठी अर्ज करण्यास हक्कदार असेल.

(ख) एका कुटुंबातील सर्व नोंदणीकृत व्यक्ती, त्यांच्यापैकी प्रत्येक अर्जदाराने मागणी केली असेल त्याप्रमाणे तितक्या दिवसांसाठी, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये आखलेल्या योजनेअनुसार रोजगार मिळण्यास हक्कदार असतील.

(३) (क) पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक अर्जदारास, त्याने केलेला अर्ज मिळाल्याचा दिनांक अथवा अर्ज आगाऊ दिला असेल त्याबाबतीत त्याने ज्या दिनांकापासून काम मागितले असेल तो दिनांक, यांपैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत, योजनेतील तरतुदींनुसार अंगमेहनतीचे अकुशल काम देण्यात आले आहे याबाबत कार्यक्रम अधिकारी खात्री करून घेईल :

परंतु, अशी कामे देताना महिलांना प्राधान्य देण्यात येईल आणि ते अशा प्रकारे देण्यात येईल की, या लाभग्राहींपैकी किमान एक तृतीयांश लाभग्राही या, ज्यांनी या अधिनियमान्वये नोंदणी केलेली आहे आणि कामाची मागणी केलेली आहे अशा महिला असतील.

(ख) काम मिळण्यासाठीचा अर्ज हा निदान सलग चौदा दिवसांच्या कामासाठी तरी असलाच पाहिजे.

(ग) काम मिळण्यासाठीचा अर्ज, योजनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे ग्रामपंचायतीला, किंवा, कार्यक्रम अधिकाऱ्याला लेखी स्वरुपात सादर करावा लागेल.

(घ) शक्य असेल तेथवर, अर्ज करण्याच्या वेळी अर्जदार ज्या गावात राहात असेल त्या गावाच्या सभोवतालच्या पाच किलोमीटर अंतराच्या परिसरात त्याला रोजगार देण्यात येईल." ;

(४) पोट-कलम (४) मध्ये,—

(एक) " समिती अधिकाऱ्याला किंवा ग्रामसेवकाला किंवा यथास्थिति, तलाठ्याला " या मजकुराऐवजी " कार्यक्रम अधिकाऱ्याला किंवा ग्रामपंचायतीला " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " राज्य शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशा दरांनी, परंतु दर दिवसास एक रुपयापेक्षा कमी नसेल इतका " या मजकुराऐवजी " राज्य शासनाकडून, राज्य परिषदेशी विचारविनिमय करून, अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दराने " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(५) पोट-कलम (५) मध्ये,—

(एक) " समिती अधिकाऱ्यास किंवा ग्रामसेवकास किंवा, यथास्थिति, तलाठ्यास " या मजकुराऐवजी " कार्यक्रम अधिकाऱ्यास " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " समिती अधिकाऱ्याने " या मजकुराऐवजी " कार्यक्रम अधिकाऱ्याने " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(६) पोट-कलमे (१०) व (११) यांमध्ये, " समिती अधिकारी " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह, जेथे जेथे आला असेल तेथे तेथे " कार्यक्रम अधिकारी " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल ;

(७) पोट-कलम (१३) मध्ये,—

(एक) " ओळखपत्रे " या मजकुराऐवजी " नोकरीची कार्डे " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " समिती अधिकाऱ्याकडे " या मजकुराऐवजी " कार्यक्रम अधिकाऱ्याकडे " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(८) पोट-कलम (१३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (१४) या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही योजनेखाली कामावर नेमलेल्या व्यक्ती, अनुसूची तीनमध्ये नमूद केलेल्या किमान सुविधांपेक्षा कमी नसतील अशा जादा सुविधा मिळण्यास हक्कदार असतील. ".

**(सहा)** कलम ९ मध्ये, " समिती अधिकाऱ्याच्या " या मजकुराऐवजी, " कार्यक्रम अधिकाऱ्याच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**(सात)** कलम १० ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

कार्यक्रम अधिकारी. " **१०.** (१) प्रत्येक पंचायत समिती स्तरावर, राज्य शासन, त्याने निर्धारित केलेली पात्रता व अनुभव धारण करणाऱ्या, गटविकास अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसणाऱ्या एखाद्या अधिकाऱ्याची कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्ती करील.

(२) कार्यक्रम अधिकारी, पंचायत समितीला, या अधिनियमखालील तिची कर्तव्ये आणि अधिनियमाखाली केलेली कोणतीही योजना पार पाडण्यासाठी सहाय्य करील.

(३) कार्यक्रम अधिकारी, रोजगारासाठीची मागणी आणि त्याच्या अधिकारितेखाली येणाऱ्या क्षेत्रामधील, प्रकल्पांमधून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी यांची सांगड घालण्यास जबाबदार असेल.

(४) कार्यक्रम अधिकारी, ग्रामपंचायतींनी तयार केलेले प्रकल्प प्रस्ताव आणि पंचायत समितीकडून प्राप्त झालेले प्रस्ताव एकत्रित करून, त्याच्या अधिकारितेखाली असणाऱ्या गटक्षेत्राकरिता योजना तयार करील.

(५) कार्यक्रम अधिकाऱ्याच्या कार्यांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल,—

(क) गटक्षेत्रामधील ग्रामपंचायतींनी आणि इतर अंमलबजावणी अभिकरणांनी हाती घेतलेल्या प्रकल्पांचे संनियंत्रण करणे ;

(ख) पात्र कुटुंबांना बेरोजगार भत्ता मंजूर करणे आणि त्यांना तो बेरोजगार भत्ता दिला जात असल्याची खातरजमा करणे ;

(ग) गटक्षेत्रामध्ये योजनेच्या कार्यक्रमांतर्गत कामावर नेमलेल्या सर्व मजुरांना तत्परतेने आणि योग्य वेतन प्रदान केले जात असल्याची खातरजमा करणे ;

(घ) ग्रामपंचायतीच्या अधिकारितेतील सर्व कामांचे ग्रामसभेकडून नियमितपणे सामाजिकदृष्ट्या मूल्यमापन होत असल्याची आणि या सामाजिक मूल्यमापनामध्ये घेतल्या गेलेल्या आक्षेपांवर तत्परतेने कार्यवाही केली जात असल्याची खातरजमा करणे ;

(ङ) गटक्षेत्रामधील योजनेच्या अंमलबजावणी संबंधात उद्भवलेल्या सर्व तक्रारींवर तत्परतेने कार्यवाही करणे ; आणि

(च) जिल्हा कार्यक्रम समन्वयकाने किंवा राज्य शासनाने त्यास नेमून दिलेले अन्य कोणतेही काम पार पाडणे.

(६) कार्यक्रम अधिकारी, जिल्हा कार्यक्रम समन्वयकाच्या निदेशानुसार, त्याच्या नियंत्रणाखाली व पर्यवेक्षणाखाली कार्य करील.

(७) राज्य शासनास, आदेशाद्वारे, कार्यक्रम अधिकाऱ्याची सर्व किंवा कोणतीही कार्ये ग्रामपंचायत पार पाडील असा निदेश देता येईल.".

**(आठ)** कलम ११ मध्ये, " समिती अधिकारी " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह जेथे जेथे आला असेल तेथे तेथे त्या मजकुराऐवजी " कार्यक्रम अधिकारी " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

**(नऊ)** कलम १२ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

योजनेची अंमलबजावणी करण्याची राज्य शासनाची जबाबदारी.

" **१२क.** राज्य शासन, योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेला कर्मचारीवर्ग व आवश्यक असलेले तंत्रविषयक पाठबळ जिल्हा कार्यक्रम समन्वयकास व कार्यक्रम अधिकाऱ्यास उपलब्ध करून देईल.

गाऱ्हाणी निवारण यंत्रणा.

**१२ख.** राज्य शासन, योजनेच्या अंमलबजावणीच्या संबंधात, कोणत्याही व्यक्तीकडून आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेण्यासाठी, नियमांद्वारे, गटक्षेत्र स्तरावर व जिल्हा स्तरावर, समुचित गाऱ्हाणी निवारण यंत्रणा नेमील आणि अशा तक्रारी निकालात काढण्यासाठी कार्यपद्धती निर्धारित करील.

पारदर्शकता व जबाबदारी.

**१२ग.** (१) जिल्हा कार्यक्रम समन्वयक व जिल्ह्यातील सर्व अंमलबजावणी अभिकरणे, योजनेची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी त्यांच्याकडे दिलेल्या निधीचा योग्य वापर व व्यवस्थापन करण्यास जबाबदार असतील.

(२) राज्य शासनास, मजुरांची नियुक्ती आणि या अधिनियमाच्या तरतुदी व त्याखाली केलेल्या योजना यांची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात केलेल्या खर्चाच्या योग्य नोंदवह्या व लेखे ठेवण्याची रीत विहित करता येईल.

(३) योजनांची व योजनांखालील कार्यक्रमांची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी आणि योजनांची अंमलबजावणी करताना सर्व स्तरांवर खात्रीपूर्वक पारदर्शकता राहावी व जबाबदारी निश्चित करता यावी यासाठी राज्य शासनास, नियमांद्वारे, उपाययोजना निश्चित करता येतील.

(४) रोख वेतन व बेरोजगार भत्ते यांची सर्व प्रदाने, पूर्व-घोषित तारखांना, संबंधित व्यक्तींना समाजातील स्वतंत्र व्यक्तींच्या उपस्थितीत थेट देण्यात येतील.

(५) ग्रामसभेकडून योजनेची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात कोणताही विवाद किंवा तक्रार उद्‌भवल्यास, ती बाब, कार्यक्रम अधिकाऱ्याकडे निर्णयार्थ सोपविण्यात येईल.

(६) कार्यक्रम अधिकारी, त्याने ठेवलेल्या तक्रार नोंदवहीमध्ये प्रत्येक तक्रीरीची नोंद करील आणि विवाद व तक्रारी मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत त्या निकालात काढील ; आणि जर तो विवाद वा तक्रार अन्य कोणत्याही प्राधिकाऱ्याने सोडवावयाच्या बाबीशी संबंधित असेल तर त्या बाबतीत, तो विवाद वा तक्रार, तक्रारदाराला कळवून अशा प्राधिकाऱ्याकडे पाठवण्यात येईल.

लेख्यांची लेखापरीक्षा.

**१२घ.** (१) राज्य शासनास, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून, सर्व पातळ्यांवर योजनांच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्याकरिता योग्य ती व्यवस्था करता येईल.

(२) योजनेचे लेखे, राज्य शासन विहित करील अशा नमुन्यात व अशा रीतीने ठेवण्यात येतील. ” .

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या अनुसूचीची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाला जोडलेल्या अनुसूचीमध्ये, “ **अनुसूची** ” या शीर्षकाऐवजी “ **अनुसूची एक** ” हे शीर्षक दाखल करण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० यामध्ये अनुसूची दोन व तीन जादा दाखल करणे.

**११.** मुख्य अधिनियमाच्या **अनुसूची एक** नंतर, पुढील अनुसूच्या जादा दाखल करण्यात येतील :—

**“ अनुसूची दोन**

(कलमे १६क व १६ख पहा)

| अनुक्रमांक | क्षेत्र |
|---|---|
| १. | धुळे महसुली जिल्हा |
| २. | नंदुरबार महसुली जिल्हा |
| ३. | अहमदनगर महसुली जिल्हा |
| ४. | औरंगाबाद महसुली जिल्हा |
| ५. | नांदेड महसुली जिल्हा |
| ६. | हिंगोली महसुली जिल्हा |
| ७. | यवतमाळ महसुली जिल्हा |
| ८. | अमरावती महसुली जिल्हा |
| ९. | भंडारा महसुली जिल्हा |
| १०. | चंद्रपूर महसुली जिल्हा |
| ११. | गोंदिया महसुली जिल्हा |
| १२. | गडचिरोली महसुली जिल्हा |

## अनुसूची तीन

[कलमे १६क व १६ख(**पाच**)(८) पहा]

**योजने अंतर्गत हमी दिलेला ग्रामीण रोजगार, आणि मजुरांचे किमान हक्क यांबाबतच्या शर्ती.**

(१) कुटुंबाच्या एकूण हक्कास अधीन राहून, व्यक्तीस अर्ज करता येईल अशा रोजगाराच्या दिवस संख्येवर किंवा प्रत्यक्षात त्याला पुरविलेल्या रोजगाराच्या दिवस संख्येवर मर्यादा असणार नाही.

(२) ग्रामपंचायत किंवा यथास्थिति, कार्यक्रम अधिकारी वैध अर्ज स्वीकारण्यास आणि अर्जदारास दिनांकित पावती देण्यास बांधील असतील.

(३) ज्यांना काम देण्यात आले आहे अशा अर्जदारांना, त्याबाबत त्यांनी नोकरीच्या कार्डावर दिलेल्या पत्त्यावर पत्र पाठवून आणि ग्रामपंचायतीच्या कार्यालयात जाहीर सूचना लावून लेखी स्वरूपात कळविण्यात येईल.

(४) या योजने अंतर्गत नवीन काम हे ----

(क) अशा कामासाठी किमान पन्नास मजूर उपलब्ध असतील ; आणि

(ख) त्या मजुरांना चालू कामामध्ये सामावून घेता येणार नसेल,

तरच सुरू करण्यात येईल :

परंतु, ही अट, राज्य शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे डोंगराळ क्षेत्रातील नवीन कामांना आणि वनरोपणाच्या बाबतीत लागू असणार नाही.

(५) पाच किलोमीटर क्षेत्राबाहेर रोजगार देण्यात आला तर त्याबाबतीत तो गटक्षेत्रांतर्गतच देणे आवश्यक असेल, आणि त्या मजुरांचा होणारा जादा वाहतूक खर्च आणि राहण्याचा खर्च भागविण्यासाठी त्यांना वेतन दराच्या दहा टक्के रक्कम अतिरिक्त वेतन म्हणून देण्यात येईल.

(६) बेरोजगार भत्ता देण्यात येत असेल अथवा देय होईल अशा सर्व प्रकरणांच्या बाबतीत कार्यक्रम अधिकारी, अर्जदारांस रोजगार देणे किंवा रोजगार देण्याची व्यवस्था करणे त्याला का शक्य झाले नाही याची कारणे लेखी स्वरूपात जिल्हा कार्यक्रम समन्वयकाला कळवील.

(७) जिल्हा कार्यक्रम समन्वयक, राज्य परिषदेला पाठवावयाच्या आपल्या वार्षिक अहवालात, ज्यांना बेरोजगार भत्ता देण्यात येत आहे अशा लोकांना रोजगार का देता येऊ शकला नाही याचे स्पष्टीकरण देईल.

(८) या योजनेमध्ये आगाऊ अर्ज करण्याची, म्हणजे ज्या दिनांकापासून रोजगाराची मागणी करण्यात आली असेल त्या दिनांकाच्या अगोदरच अर्ज सादर करता येईल अशी तरतूद करण्यात येईल.

(९) या योजनेमध्ये एकाच व्यक्तीला अनेक अर्ज सादर करता येण्याची तरतूद करण्यात येईल. मात्र, ज्या कालावधीसाठी रोजगाराची मागणी करण्यात आली असेल ते कालावधी परस्परव्याप्त असता कामा नयेत.

(१०) ग्रामपंचायत तिच्याकडे नोंदणी केलेल्या व्यक्तींच्या नावांची व पत्त्यांची यादी, या योजनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत व अशा नमुन्यात संबंधित कार्यक्रम अधिकाऱ्याकडे पाठवील आणि अशी अन्य माहिती त्याला पुरवील.

(११) ज्यांना काम देण्यात आले असेल अशा व्यक्तींची यादी ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर आणि कार्यक्रम अधिकाऱ्याच्या कार्यालयात तसेच कार्यक्रम अधिकाऱ्यास आवश्यक वाटेल अशा अन्य ठिकाणी लावण्यात येईल आणि राज्य शासनाला किंवा कोणत्याही इच्छुक व्यक्तीला पाहण्यासाठी ती खुली असेल.

(१२) कामाच्या ठिकाणी सुरक्षित पिण्याचे पाणी, मुलांसाठी छपऱ्या व विश्रांतीसाठीची वेळ, काम पार पाडताना होणाऱ्या लहान सहान जखमांवर आणि कामामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या इतर समस्यांवर तातडीचे उपचार करण्यासाठी पुरेशा साहित्यासह असलेली प्रथमोपचार पेटी या सुविधा पुरविण्यात येतील.

(१३) योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत मजुरांना वेतन देण्यात आले नाही तर, ते वेतन प्रदान अधिनियम, १९३६ याच्या तरतुदींनुसार भरपाई मिळण्यास हक्कदार असतील. १९३६ चा ४.

(१४) या योजने अंतर्गत द्यावयाचे वेतन एकतर पूर्णतः रोख स्वरूपात किंवा रोख व वस्तुंच्या रूपात देता येईल. परंतु किमान एक चतुर्थांश वेतन हे रोख स्वरूपातच देण्यात येईल.

(१५) राज्य शासनास, रोजगार कालावधीत मजुरांना देण्यात येणारे रोख वेतन दैनिक वेतनाच्या रूपाने देण्यात यावे असे विहित करता येईल.

(१६) या योजनेखाली कामावर नेमताना केव्हाही केवळ स्त्री-पुरुष या कारणावरून कोणताही भेदभाव केला जाणार नाही आणि त्याबाबत समान पारिश्रमिक अधिनियम, १९७६ याच्या तरतुदींचे अनुपालन करण्यात येईल. ". १९७६ चा २५.

## निवेदन

राज्यातील ग्रामीण क्षेत्रांमध्ये अकुशल अंगमेहनतीचे काम स्वेच्छेने करू इच्छिणाऱ्या सर्व प्रौढ व्यक्तींना रोजगाराची हमी देऊन त्यांचा कामाचा हक्क सुरक्षित करण्याच्या दृष्टीने परिणामक तरतुदी करण्यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (१९७८ चा महा. २०) अधिनियमित केलेला आहे.

२. आपल्या राज्यातील रोजगार हमी योजनेचे यश विचारात घेऊन, केंद्र सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ (२००५ चा ४२) अधिनियमित केला आहे. उक्त केंद्रीय अधिनियमाची सर्व देशभर टप्प्याटप्याने अंमलबजावणी करण्यात येणार असून सध्या त्याची, राज्यातील १२ जिल्ह्यांसह भारतातील २०० जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे. उक्त केंद्रीय अधिनियमाच्या कलम २८ मध्ये, इतर गोष्टींबरोबर अशी ही तरतूद आहे की, जर एखाद्या राज्यामध्ये ग्रामीण कुटुंबांना रोजगाराची हमी देण्यासाठी केंद्रीय अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत असा राज्य अधिनियम अस्तित्वात असेल किंवा असा अधिनियम अधिनियमित करण्यात आला असेल आणि त्याच्या खालील रोजगाराच्या शर्ती या केंद्रीय अधिनियमान्वये हमी दिलेल्या शर्तीपेक्षा दुय्यम स्वरूपाच्या नसतील तर तेथे राज्य शासनास, आपला स्वतःचा कायदा राबवण्याचा पर्याय उपलब्ध असेल. उक्त कलम २८ च्या दुसऱ्या परंतुकामध्ये अशी तरतूद आहे की, अशा प्रकरणांमध्ये, राज्यांनी जर केंद्रीय कायद्यान्वये एखाद्या योजनेची अंमलबजावणी केली असती तर, केंद्र सरकारकडून पुरविण्यात येणारे जे वित्तीय सहाय्य मिळण्यास राज्य हक्कदार झाले असते, त्यापेक्षा त्या वित्तीय सहाय्यामध्ये वाढ होणार नाही. त्यानुसार, महाराष्ट्र राज्याने, विवक्षित फेरबदलांसह राज्याच्या कायद्याची अंमलबजावणी सुरू ठेवण्याचे ठरविले आहे.

३. उक्त केंद्रीय अधिनियमाच्या तरतुदी लक्षात घेऊन, केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या राज्याच्या १२ जिल्ह्यांमध्ये रोजगार हमी योजनेची, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती व ग्रामसभा यांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहभागाने अंमलबजावणी करण्याची सुनिश्चिती करण्याच्या हेतूने, महाराष्ट्र शासनास, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटते.

४. प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत,—

(एक) योजनांचे संनियंत्रण करण्यासाठी व पुनर्विलोकन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद घटित करणे ;

(दोन) प्रत्येक नोंदणीकृत कुटुंबाला नोकरीचे कार्ड देणे ;

(तीन) ग्रामसभेच्या शिफारशीनुसार, योजनेखाली हाती घ्यावयाच्या, त्याच्या क्षेत्रातील प्रकल्पांची निश्चिती करण्याची आणि अशा कामांची अंमलबजावणी करण्याची आणि त्यांचे पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीवर असणे ;

(चार) योजनेखालील सर्व प्रकल्पांचे, ग्रामसभेने नियमित सामाजिक मूल्यमापन करणे व त्याचे संनियंत्रण करणे ;

(पाच) केंद्र सरकारने विनिर्दिष्ट केलेल्या वेतन दराने वेतन देणे ;

(सहा) अधिनियम आणि त्याखाली केलेल्या योजना यांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता राखणे आणि सर्व स्तरांवर योजनांची लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करणे.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (१९७८ चा महा. २०) यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ३१ ऑक्टोबर २००६.

**एस्. एम्. कृष्णा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. स. सहारिया,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई